महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१० /४९२/३५६
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**परिपत्रक**

क्र. १०/पदविका-मा.प्र./उन्हाळी सुट्टी २०२५-२६/१७६ दिनांक : १४.०५.२०२६

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सुट्टी बाबत....**

संदर्भ : १. शैक्षणिक वेळापत्रक क्र.MSBTE/D-४०/Academic Calendar/२०२५/१३६, दि.२२.०५.२०२५.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मरातंशिमं/का-५१/उन्हाळी सुट्टी/२०२६/१५३५, दि.११/०५/२०२६.

राज्यातील संचालनालयांतर्गत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी २० दिवस हिवाळी सुट्टी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यापैकी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सम सत्रातील प्रात्यक्षिके व टर्म एंड ( Term End ) परिक्षांचे आयोजन, प्रवेश प्रक्रिया, जनगणना तसेच शैक्षणिक कामाकरीता ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा अत्यावश्यक आहेत त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भीय क्रमांक २ च्या पत्रान्वये पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाजासाठी तसेच "स्कूल कनेक्ट" उपक्रम राबविण्यासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून **दिनांक २२.०५.२०२६ ते दिनांक ३०.०६.२०२६ या कालावधीत एकूण ४० दिवस उन्हाळी** सुट्टी देण्यात यावी.

परीक्षा व मंडळस्तरावरील कामकाज या महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल ते उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून सदर कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

Digitally signed by
VINOD MAHADEORAO MOHITKAR
Date: 14-05-2026 14:35:19

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित तंत्रनिकेतने/ इतर तत्सम पदविका संस्था ( विभागीय कार्यालयामार्फत )
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पु.), मुंबई-५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/ छत्रपती संभाजी नगर /नागपूर.
५. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २, ४, ४अ, १२ मुख्य कार्यालय, मुंबई.
६. प्रणाली व्यवस्थापक, का.क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

Dte Desk10